01 APR 2024 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संत तुकारामांचे काव्य म्हणजे भारतीय परंपरेचे शिखर

- शिवाजी विद्यापीठातील डॉ. रणधीर शिंदे यांचे मत
- ताराराणी विद्यापीठात तुकाराम बीजनिमित्त व्याख्यान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

तुकाराम गाथेमधून मानवी जीवनातील वैश्विक सत्य अभंगातून मांडतात. त्यामुळे संत तुकारामांचे काव्य म्हणजे भारतीय परंपरेचे शिखरच म्हणावे लागेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

ताराराणी विद्यापीठातील आयोजित तुकाराम बीज कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. 'संत तुकाराम कवी आणि संत' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील होते.



**कोल्हापूर : आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. रणधीर शिंदे.**

डॉ. शिंदे म्हणाले, संत तुकारामांनी भक्ती परंपरेत काव्यातून समाज परिवर्तन घडवून आणणारे, अभंगातून तत्वज्ञान नितीशास्त्र प्रसंगानुरूप अनुभव अभंगातून मांडले. सूत्रसंचालन एस. डी. चव्हाण यांनी केले. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. एस. पी. पाटील यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, जे. एस. पाटील, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2024
पुढारी

# डॉ. नगिना माळी यांना इनोव्हेशन पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील शिक्षक डॉ. नगिना माळी यांना सोलापूर येथील सर फौंडेशनच्यावतीने इनोव्हेशन पुरस्कार जाहीर झाला आहे. सोलापूर येथील स्टेट इनोव्हेशन अँन्ड रिसर्च फाऊंडेशन संस्थेतर्फे 'राष्ट्रीय स्तर नवोपक्रम स्पर्धा-२०२३' आयोजित केली होती. स्पर्धेसाठी डॉ. माळी यांनी 'प्रभावशाली अध्ययन-अध्यापन प्रतिमान: एक नाविन्यपूर्ण उपक्रम' हा नवोपक्रम सादर केला. या नवोपक्रमाला पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण मे २०२४ मध्ये विशेष राष्ट्रीय एज्युकेशनल इनोव्हेशन कॉन्फरन्समध्ये करण्यात येणार आहे.



डॉ. नगिना माळी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2024
तरुण भारत

# डॉ. नगिना माळी यांना सर फौंडेशनचा इनोव्हेशन पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागातील डॉ. नगिना माळी यांना सोलापूर येथील सर फौंडेशनचा इनोव्हेशन पुरस्कार



जाहीर झाला आहे. मे २०२४ मध्ये होणाऱ्या एज्युकेशनल इनोव्हेशन परिषदेत पुरस्कार वितरण होणार आहे. सोलापूर येथील 'स्टेट इनोव्हेशन अॅन्ड रिसर्च फाऊंडेशन (सर फाऊंडेशन) या संस्थेतर्फे 'राष्ट्रीय स्तर नवोपक्रम स्पर्धा-२०२३' आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी डॉ. नगिना माळी यांनी 'प्रभावशाली अध्ययन-अध्यापन प्रतिमानः एक नाविन्यपूर्ण उपक्रम' हा नवोपक्रम सादर केला. या नवोपक्रमाला 'सर फाऊंडेशन एज्युकेशनल इनोव्हेशन नॅशनल अवॉर्ड-२०२३' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2024
सकाळ



मयूरी गुरव



भक्ती बाटे

# मयूरी, भक्तीचे 'गेट' परीक्षेत यश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील एम.एस्सी. अंतिम वर्षाच्या मयूरी गुरव व भक्ती बाटे या पदवीधर अभियोग्यता चाचणी - २०२४ (गेट) परीक्षेत उत्तीर्ण झाल्या. राष्ट्रीय स्तरावर सर्वाधिक काठीण्यपातळी असणारी परीक्षा म्हणून 'गेट' ओळखली जाते. मयूरी भुदरगड तालुक्यातील दुर्गम दिंडेवाडी गावची असून, तिने गडहिंग्लजमधील शिवराज महाविद्यालयातून बी.एस्सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. भक्ती मूळची फुलेवाडी येथील आहे. तिने एम.एस्सी. (ऑरगॅनिक केमिस्ट्री) पदव्युत्तर पदवी मिळवली आहे. दोघींचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी अभिनंदन केले.